SBM bank

सफलतेचे उपाय,
बँकिंग सुधारण्यासाठी घडवलेले.

# परिचय

**एसबीएम बँक (इंडिया) लिमिटेड ही पहिली परकीय बँक आहे जिला 'पूर्ण मालकीची उपकंपनी' (डब्ल्युओएस) मॉडेल अंतर्गत अनुसूचित व्यावसायिक बँक स्वरूपात प्रस्थापित होण्यास आणि कारभार करण्यास भारतीय रीझर्व्ह बँकेकडून जागतिक बँकिंग परवाना मिळाला आहे.**

बँकेने भारतामध्ये आपल्या कारभाराची 7 वर्षे पूर्ण केली आहेत आणि ती पाच दशकांहून अधिक काळाचा वारसा जपणाऱ्या एका जागतिक वित्तीय सेवा संघटनेचे अर्थात एसबीएम ग्रूपचे एक अंग आहे. एसबीएम ग्रूप ही मॉरिशसमधील एक आघाडीची बँकिंग आणि वित्तीय सेवा संस्था आहे स्टॉक एक्सचेंज ऑफ मॉरिशस वर सूचित असलेली तिसरी सर्वांत मोठी संस्था आहे.

**बँक तीन विभागांमधून कार्य करते – कॉर्पोरेट, रीटेल आणि फायनान्शिअल मार्केट्स.** वेगवान तंत्रज्ञान आणि बँकिंगमधील सखोल कौशल्याचा मेळ साधून, आम्ही इतरांपासून वेगळे ठरणारे मूल्य प्रस्ताव विकसित केले आहेत आणि पुरवले आहेत. आमच्या विस्तृत उत्पादनांमुळे आम्ही एका मोठ्या आणि वैविध्यपूर्ण ग्राहकवर्गाला सेवा पुरवू शकतो, ज्यामध्ये डिजिटल–फर्स्ट ग्राहक, हे उदयोन्मुख संपन्न क्षेत्र, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई), अनिवासी भारतीय (एनआरआय), उच्च नेट वर्थ आणि अत्युच्च नेट वर्थ व्यक्ती, आणि मध्यम ते महा कॉर्पोरेट्स अशा सर्वांचा समावेश होतो. एका बहुराष्ट्रीय वित्तीय सेवा समूहाचा भाग असल्याने, आमच्या पालक समूहाच्या आशिया आणि आफ्रिका खंडातील उपस्थितीचा आणि अनुभवाचा लाभ घेत, आम्ही सीमेपलीकडील व्यवहारांसाठी अखंड सोल्युशन्स पुरवतो.

आमचे मुख्यालय मुंबईमध्ये असून, एसबीएम बँक इंडिया 10 राज्यांतील आणि केंद्रशासित प्रदेशातील महानगरांत 23 मोक्याच्या ठिकाणी वसलेल्या शाखांमधून कार्यरत आहेत. बँकेला या क्षेत्रातील सखोल कौशल्य आणि बँकिंग व वित्तीय सेवां उद्योगामधील दिग्गजांचे नेतृत्व लाभलेले आहे. 750 हून अधिक कर्मचाऱ्यांच्या टीमचे बळ पाठीशी असणारी ही बँक देशभरातील 2 दशलक्षांहून अधिक ग्राहकांना आणि गिऱ्हाईकांना सेवा पुरवते.

एसबीएम बँक इंडिया येथे, आम्ही कार्यक्षमरीत्या उपायाभिमुख पद्धतींचा अवलंब करतो. आमच्या प्रवर्गातील सर्वोत्तम बँकिंग आणि संपत्ती उपायांसह, आम्ही वाढीव मूल्य आणि वैयक्तिक पातळीवर सानुकूलित बँकिंगचा अनुभव देतो जो आमच्या ग्राहकांच्या वाढत्या गरजांची पूर्तता करणारा असतो.

एसबीएम प्रायव्हेट

एसबीएम वेल्थ

स्मार्ट बँकिंग

फायनान्शिअल मार्केट्स

कॉर्पोरेट आणि एसएमई फायनान्सिंग

ट्रेड फायनान्स आणि कॅपिटल मार्केट्स

जागतिक वित्तीय संस्थांचे बिझनेस कव्हरेज





SBM Private
POWERFULLY GLOBAL

सामर्थ्य. शक्यता. विशेषाधिकार.

एसबीएम प्रायव्हेट – संपत्तीला तिच्या पारंपरिक मर्यादेपलीकडे नेण्यासाठी आणि अमर्याद शक्यता उपलब्ध करून देण्यासाठी आणि त्याबरोबरच बँकिंगचा अतुलनीय अनुभव देण्यासाठी घडवलेल्या उत्पादनांचा श्रेष्ठ संच.

प्रवर्गातील सर्वोत्तम लाभांचा, आणि तुमच्या बँकिंगच्या, गुंतवणुकीच्या, फायनान्सिंगच्या आणि जीवनशैलीच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी विशेष आकार दिलेल्या अनेक सोल्युशन्सचा आनंद घ्या.

## एसबीएम प्रायव्हेटकडून श्रेष्ठ उत्पादनांचा संच

### प्रवर्गातील सर्वोत्तम बँकिंग सोल्युशन्स

- दरमहा व्याज देणाऱ्या सेव्हिंग्ज अकाऊंटवर 7.00% द.सा. पर्यंतचे रीटर्न्स*
- एनआरआयकरिता प्रवर्गातील सर्वोत्तम दर देणारे एनआरई, एनआरओ आणि एफसीएनआर फिक्स्ड डिपॉझिट्स
- एनआरआय ग्राहकांना अत्युत्तम रीटर्न्स देण्यासाठी विशेष फॉरवर्ड बॅक्ड फिक्स्ड डिपॉझिट्स
- इनवर्ड / आऊटवर्ड रेमिटन्सवर प्रवर्गातील सर्वोत्तम दर
- लोन्सवर विशेष सवलतीचे दर
- अकाऊंट उघडण्याचे आणि मेंटेनन्सचे शून्य चार्जेस
- तुमच्या साहाय्यासाठी अनुभवी रीलेशनशिप मॅनेजर

### नवी क्षितीजे खुली करण्यासाठीची वेल्थ सोल्युशन्स

- भारताच्या ग्रोथ स्टोरीमध्ये सहभाग घेण्याची संधी
- अनेक प्रकारचे सेबीकडे नोंदणीकृत म्युच्युअल फंड्स उपलब्ध – इक्विटी, डेट आणि हायब्रिड प्रवर्गांमधील – खास तुमच्या आर्थिक ध्येयांना अनुरूप ठरण्यासाठी निवडलेले
- आघाडीच्या सेबी–नोंदणीकृत पोर्टफोलिओ व्यवस्थापन सेवा (पीएमएस) पुरवठादारांशी सहयोग साधा आणि अल्टर्नेट इन्व्हेस्टमेंट फंड्समधील (एआयएफ) एक्सक्लुझिव्ह संधी शोधा, ज्या दीर्घकालीन संपत्ती निर्मितीसाठी प्रोफेशनली व्यवस्थापित, सानुकूलित पोर्टफोलिओ देतात आणि त्याचबरोबर प्रायव्हेट इक्विटीमध्ये वैविध्य व इतर पर्यायी नीती पुरवतात
- आयआरडीएआय निर्देशांतर्गत वितरित विश्वासार्ह इन्शुरर्सकडील लाइफ, हेल्थ आणि जनरल इन्शुरन्स उत्पादनांसह तुमच्या संपत्तीचे रक्षण करा आणि ती वाढवा

### एसबीएम वर्ल्ड एलिट मेटल डेबिट कार्डसह सर्वोत्तमाचा अनुभव घ्या

- आंतरराष्ट्रीय डेबिट कार्ड व्यवहारांवर शून्य फॉरेक्स मार्कअप
- अनोख्या सवलतींसह ताज एपिक्युअर प्रिमियम सदस्यत्व
- मिशेलिन स्टार रेस्टॉरंट्समध्ये प्रवेशास प्राधान्य आणि प्राईम टेबल्स
- जगभरातील 3800+ हॉटेल्समध्ये लक्झरी स्टेचे लाभ
- एअरपोर्ट लाऊंजमध्ये विनामूल्य प्रवेश#
- एपीएसी मधील गोल्फ कोर्सेसवर# विनामूल्य ग्रीन फीज् आणि व्हीआयपी प्रवेश
- प्रायव्हेट जेट प्रोग्रॅम्स#
- ग्लोबल एक्सपर्ट–हेल्थकेअर सर्व्हिसेसची प्राप्ती
- तुमच्या क्रीडेन्शिअल्सचे रक्षण करण्यासाठी मास्टरकार्ड आयडी थेफ्ट प्रोटेक्शन




*#नियम व अटी लागू.

*सेव्हिंग्ज व्याजदर वाढीव बॅलन्सवर लागू होईल. वरील दर पूर्वसूचनेशिवाय बदलाच्या अधीन आहेत. कृपया डिपॉझिटर्सनी गुंतवणूक करण्यापूर्वी संबंधित शाखेमधून व्याज निश्चित करून घ्यावा.

आमच्या वेबसाईटवर जाण्यासाठी
हा कोड स्कॅन करा.



**संपत्ती म्हणजे – एक माध्यम नाही तर दुसरे काय?** आयुष्यात सर्वोत्कृष्ट कारागिरांनी घडवलेल्या चांगल्या गोष्टींकडे नेणारा एक मार्ग. संपत्तीचा पुढचा टप्पा म्हणजे स्वातंत्र्य – नव्याने शोध लावण्याचे, नवनिर्मिती, नवरचना करण्याचे, आणि प्रत्येक स्वप्न, अनुभव आणि ॲडव्हेंचर लक्षात ठेवण्याचे – जगाला देता येईल त्या सर्वोत्तमाचा अनुभव घेण्याचे. एसबीएम वेल्थ – सामर्थ्यशाली बँकिंग सोल्युशन्स आणि एक्सक्लुझिव्ह लाईफस्टाईल प्रिव्हिलेजेसचा एक परिपूर्ण मेळ, तुमच्यासाठी जे चांगले आहे त्याचा आनंद घेण्यासाठी आणि त्यामध्ये गुंतवणूक करण्यासाठी.

### वैयक्तिक बँकिंग सेवांचा एक एक्सक्लुझिव्ह क्लास

- तुमच्या पसंतीचा अकाऊंट क्रमांक एका समर्पित रीलेशनशिप मॅनेजरसह
- स्पर्धात्मक फॉरेक्स दर
- तुमच्या वैयक्तिक सेव्हिंग्ज अकाऊंटवर मासिक व्याज पेआऊटसह आकर्षक रीटर्न्स
- प्रवर्गातील सर्वोत्तम फिक्स्ड डिपॉझिट्स
- तुम्हाला प्रिमियम अनुभव, विशेष सवलती आणि प्रिमियम ब्रँड्समधून वेचून दिलेले लाभ मिळवून देण्यासाठी एसबीएम डेबिट कार्ड
- अनिवासी ग्राहकांसाठी प्रवर्गातील सर्वोत्तम रचना

### एसबीएम डेबिट कार्डच्या विशेष सवलती

- देशांतर्गत आणि जागतिक एअरपोर्ट लाऊंजमध्ये प्रवेश – तुमचा प्रवास – मग तो कामासाठी असो किंवा आनंदासाठी – सर्वत: सुखकर करण्यासाठी एअरपोर्टवरील सेवांचा पूर्णत: संकलित संच
- आंतरराष्ट्रीय व्यवहारांसाठी डेबिट कार्ड वापरल्यावर शून्य फॉरेक्स मार्कअप
- भारतामध्ये विनामूल्य गोल प्रोग्रॅम – तुमच्या पसंतीचा टी टाईम, फाईव्ह स्टार रीसॉर्टमध्ये वास्तव्य, एक्सक्लुझिव्ह कोर्सेसमध्ये प्रायव्हेट ग्राऊंड टूर्स

### शक्तिशाली आणि वैविध्यपूर्ण संपत्ती व्यवस्थापनाचे सोल्युशन्स तुमची संपत्ती अधिकाधिक वाढवण्यासाठी

- म्युच्युअल फंड्स
- अल्टर्नेटिव्ह इन्व्हेस्टमेंट फंड्स
- सुरचित उत्पादने
- पोर्टफोलिओ व्यवस्थापन सेवा
- जागतिक गुंतवणुकीच्या संधी
- फिक्स्ड इन्कम ऑफरिंग्ज (बाँड्स)
- जनरल आणि लाईफ इन्शुरन्स
- इंटरॲक्टिव्ह ॲनालिटिक्स, पोर्टफोलिओ एकत्रीकरण आणि परफॉर्मन्स अपडेटसह

आमच्या वेबसाईटवर जाण्यासाठी
हा कोड स्कॅन करा.



# स्मार्ट बँकिंग

फायनान्सच्या जगतात, नातेसंबंध कामी येतात! निर्वाहक्षम मूल्यनिर्मिती करण्याचा प्रवास सुरु करून, आम्ही एसबीएम बँक इंडिया येथे उदयोन्मुख, महत्त्वाकांक्षी आणि तरुण दूरदर्शी साथीदारांसह सहयोग साधत राहतो. अशा संधी साधण्याची नीतीने आम्हाला सर्वाधिक सर्वसमावेशक उत्पादनांचा असा पोर्टफोलिओ तयार करण्यास आणि अधिक सखोल सहयोग प्रस्थापित करण्यास मदत केली, ज्यामुळे आणखी निर्वाहक्षम उत्पादनांचा अधिकाधिक विकास होत गेला. आम्ही एका विस्तृत ग्राहकवर्गाच्या कायम वृद्धिंगत होत जाणाऱ्या गरजांची पूर्तता करण्यासाठी उत्तम सेवांचा आणि सोल्युशन्सचा एक संच काळजीपूर्वक तयार केला आहे.

आम्ही एसबीएम बँक इंडिया येथे यास स्मार्ट बँकिंग असे म्हणतो. आमचा स्मार्ट बँकिंग उत्पादन संच तीन आधारस्तंभा वर उभारला आहे: सहयोग । तंत्रज्ञान । अभिनवता

**आमचे सहयोग विविध क्षेत्रांच्या गरजा पुरवण्यासाठी यांसारख्या सोल्युशन्सचा अवलंब करतात:**

### कार्ड्स:

डिपॉझिट्सवर स्पर्धात्मक रीटर्न्सचा आनंद घेत एक अधिक शक्तिशाली क्रेडिट प्रोफाइल उभी करा, आमच्या संरक्षित क्रेडिट कार्ड प्रस्तावासह.

### डिजिटल बँकिंग सोल्युशन:

उच्च व्याज देणारे सेव्हिंग्ज अकाऊंट (बचत खाते) आणि इंटरनॅशनल डेबिट कार्ड आणि मोबाईल बँकिंगचा सुखद अनुभव मिळवण्यासाठी.

आमच्या वेबसाईटवर जाण्यासाठी हा कोड स्कॅन करा.



# फायनान्शिअल मार्केट्स

''विश्वसनीयतेसह सातत्य'' हे आमच्या सर्व उपक्रमांना चालना देणारे ब्रीदवाक्य आहे. त्यामुळेच, आमच्या प्रिमियम बँकिंग सोल्युशन्सचा गाभा असणारे एसबीएम बँक इंडियाचे ट्रेझरी व्हर्टिकल ग्राहकांना सानुकूलित उत्पादने आणि सेवा देऊ करते – त्यांच्या विशिष्ट गरजांना अनुसरून. जगभरात पाळल्या जाणाऱ्या सर्वोत्तम ग्राहकाभिमुख प्रथांच्या तोडीस तोड राहून रचलेले हे व्हर्टिकल अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून गरजेनुरूप सोल्युशन्स पुरवते आणि युझर-फ्रेंडली अनुभव देते.

- परकीय चलन पाठवणी आणि रूपांतरण – रुपये, युएस डॉलर आणि इतर चलनांच्या जोड्या
- व्याजदर आणि करन्सी स्वॅप्स यांच्या मिश्रणातून बाह्य व्यावसायिक ऋणावरील ग्राहकाच्या व्याजदराचे आणि / किंवा चलन जोखमीचे हेजिंग
- ग्राहकाच्या भावी परकीय चलनाच्या प्रवाहाचे हेजिंग (देय किंवा येणे असलेले परकीय चलन) करण्यासाठी अनेक प्रकारची फॉरेक्स उत्पादने, व्हॅनिला कॅश, टीओएम आणि स्पॉट मूव्हिंगपासून ते दीर्घकालीन फॉरवर्ड कॉंट्रॅक्ट्स आणि व्हॅनिला / स्ट्रक्चर्ड ऑप्शन्स यांसारख्या अंशत: अधिक गुंतागुंतीच्या रचना
- फॉरेक्स-रीटेल सीसीआयएल प्लॅटफॉर्म, जो सर्व बँकिंग ग्राहकांसाठी परकीय चलनाची खरेदी किंवा विक्री करण्यासाठी भारतीय रीझर्व्ह बँकेने सुरु केलेला आणि सीसीआयएलने विकसित केलेला एक इलेक्ट्रॉनिक ट्रेडिंग प्लॅटफॉर्म आहे
- इतर ओव्हर-दि-काऊंटर परकीय चलन सेवा उदा. चलने आणि ट्रॅव्हलर्स चेक
- नियमित फॉरेक्स फ्लो असणाऱ्या निवडक ग्राहकांसाठी ऑनलाईन फॉरेक्स डीलिंग प्लॅटफॉर्म
- ग्राहकाच्या क्षेत्रासाठी अनुरूप अशी, त्यांच्या एसएलआर आणि एसएलआर-व्यतिरिक्त डेट इट्रुमेंटमधील गुंतवणुकीशी संबंधित गरजांसाठी डेट मार्केटमधील विक्री आणि सोल्युशन्स, ज्यामध्ये प्रोव्हिडंट फंड्स, वेल्थ, सहकारी बँका आणि कॉर्पोरेट्सचा समावेश असेल

आमच्या वेबसाईटवर जाण्यासाठी हा कोड स्कॅन करा.

# कॉर्पोरेट आणि एसएमई फायनान्सिंग

जेव्हा आर्थिक बुद्धिमत्तेची शक्ती आणि दूरदर्शी मूल्यांचे बळ हे एकत्र येतात, तेव्हा कायापालट घडून येतो. उद्योगक्षम अर्थव्यवस्थेचे स्वास्थ्य वाढवण्यासाठी आवश्यक असणारे अनेक फंड आधारित व फंड-व्यतिरिक्त फायनान्सिंग सोल्युशन्स आम्ही देऊ करतो, ज्यांमध्ये आमच्या व्यवहारांची स्वतंत्रपणे हमी देण्याच्या व तसेच इतर बँकांनी सुरु केलेल्या फायनान्सिंगमध्ये भाग घेण्याच्या सुविधा उपलब्ध असतात.

**या क्षेत्रामधील आमच्या उत्पादनांच्या रेंजमध्ये समाविष्ट आहेत:**

- लघु आणि दीर्घकालीन लोन्सचे फायनान्सिंग
- ॲडव्हायसरी आणि सिंडिकेशन सेवा
- सप्लाय चेन फायनान्स
- कमोडिटी फायनान्सिंग
- अनुभवी आणि ग्राहकाभिमुख रीलेशनशिप मॅनेजर्स
- सानुकूलित एमएसएमई कर्ज
- स्टार्ट अप फायनान्सिंग

# ट्रेड फायनान्स आणि भांडवल बाजार

आम्ही यशाला वाहून घेतलेले असल्यामुळे, आमचे उद्दिष्ट हे बँकिंगच्या विभिन्न गरजांची पूर्तता करणे आणि सीमेपलीकडील व्यवहारांना बळ देणारे सर्वसमावेशक सोल्युशन्स पुरवणे आहे.






**ट्रेड फायनान्स, आयसीसी निर्देश, करंट आणि कॅपिटल अकाऊंट्स व्यवहार कौशल्य यांसाठी ॲडव्हायसरी सेवा आणि पुढील बाबींसाठी सानुकूलित सोल्युशन्स:**

- लेटर ऑफ क्रेडिट
- बँक गॅरंटीज्
- इम्पोर्ट बिल्स अंडर कलेक्शन
- मर्चंटिंग ट्रेड
- ट्रेड क्रेडिट
- शासकीय रोख्यांवर आणि बाँड्सवर, रीसीव्हेबल्सवर, रोख्यांवर ओव्हरड्राफ्ट
- एक्सपोर्ट फायनान्स (शिपमेंट पूर्वी/नंतर)
- एलसी ॲडव्हायसिंग/पुष्टी
- एक्सपोर्ट बिल्स अंडर कलेक्शन
- इनवर्ड/आऊटवर्ड रेमिटन्सेस
- कॅपिटल अकाऊंटमधील व्यवहार

आमच्या वेबसाईटवर जाण्यासाठी हा कोड स्कॅन करा.

एसबीएम बँक इंडिया संस्थात्मक आणि कॉर्पोरेट ग्राहकांनाही बँकिंग सेवा पुरवते - ज्यामध्ये विविध बिझनेस व्हर्टिकल्समधील स्थानिक आणि आमच्या जागतिक चॅनेल पार्टनर्समार्फत सीमाबाह्य सुविधा पुरवल्या जातात.

आमच्या वेबसाईटवर जाण्यासाठी हा कोड स्कॅन करा.

# जागतिक वित्तीय संस्थांचे बिझनेस कव्हरेज

उत्कृष्टतेच्या आमच्या अविरत शोधात, एसबीएम बँक इंडिया सक्रियपणे, अनुभवी प्रोफेशन्सलच्या आणि प्रॉडक्ट स्पेशलिस्ट्सच्या मोठ्या टीमसह, जगभरातील आघाडीच्या सहयोगी बँकांसोबत सशक्त एफआय (आर्थिक संस्थात्मक) नातेसंबंध जोपासते, व त्याद्वारे भारतामध्ये एक बळकट डोमेस्टिक फ्रँचाइझी प्रस्थापित करते.

एक बँक म्हणून आमचा भर सुसज्ज असा एफआय अभिमुख व्यवसाय करण्यावर आहे, विशेषत: एफआय ट्रेड, ट्रेझरी आणि करस्पाँडंट बँकिंग वाढवण्या-वर. आंतरबँकीय कर्जाची देवाणघेवाण, सेकंडरी मार्केट रिस्कमध्ये सहभाग, स्टँडबाय लेटर ऑफ क्रेडिटवर फंडिंग, आरए फायनान्सिंग आणि बरेच काही.

एसबीएम ग्रूपला लक्षणीय आणि भव्य ट्रेड पॅट्रोनेज मिळते, विशेषत: हिंदी महासागरी प्रदेशातून आणि आफ्रिकेमधून. ग्रूपची पूर्व आफ्रिकेतील आणि मॉरिशसमधील उपस्थिती या व्यापारी मार्गाच्या महत्त्वाचा लाभ घेण्यास मदत करते, आणि बँकेची या प्रांतामधील व्यापारात आणि विकासात महत्त्वाची भूमिका बजावण्याची इच्छा टिकून आहे.

बँक तिच्या ग्राहकवर्गाला मूल्य मिळवून देण्यासाठी आणि त्याच्या फायद्यासाठी ग्रूपच्या भौगोलिक नेटवर्कच्या बळाचाही उपयोग करून घेते.

आम्ही जगभरातील विविध भौगोलिक प्रदेशांत पार्टनर बँकांशी सहयोग साधला आहे - यामध्ये युरोप, सार्क, युएसए, दक्षिण आशिया, ओशनिया, आशिया-पॅसिफिक, मध्यपूर्व आणि आफ्रिका यांचा समावेश होतो.

आम्ही भारतीय रुपयासाठी एक पूर्णपणे सुसज्ज आयएनआर क्लिअरिंग सेवा पुरवठादार आहोत, आणि आम्ही आयएनआर व्हॉस्त्रो अकाऊंट संबंधांकरिता आमच्या पार्टनर ग्राहकांच्या सेवा पुरवण्यासही कायम सुसज्ज असतो.

जगभरातील आमचे सहयोग




1. आशिया पॅसिफिक 2. दक्षिण आशिया 3. मध्य पूर्व 4. हिंदी महासागर आरआयएम आणि आफ्रिका

5. युरोप 6. ओशनिया 7. सार्क

# सशक्त डिपॉझिट फ्रँचाइझी

21.2%

**आमच्या डिपॉझिटमधील वाढ:**
एकूण डिपॉझिट्समध्ये आ.व.26 मध्ये आ.व.25 च्या तुलनेत वर्षागणिक वाढ 21.2% होती, जी स्थिर वेग दर्शवते.

41.7%

**सेव्हिंग्ज अकाऊंट (एसए) डिपॉझिट्स:**
आ.व.26 मध्ये आ.व.25 च्या तुलनेत 41.7% ची लक्षणीय वर्षागणिक वाढ साध्य केली, ज्यामधून सशक्त ग्राहक सहभाग दिसून येतो.

13.7%

**टर्म डिपॉझिट्स:**
आ.व.26 मध्ये आ.व.25 च्या तुलनेत 13.7% ची निर्वाहक्षम वर्षागणिक वाढ दिसून आली, ज्यातून सुरक्षित गुंतवणुकांसाठी बँकेचे आकर्षण सिद्ध झाले.

# आगाऊ रकमांमधील वाढ आणि संपदांची गुणवत्ता

32.4%

आगाऊ रकमांमध्ये आ.व.26 मध्ये आ.व. 25 च्या तुलनेत 32.4%ची वर्षागणिक वाढ झाली, जिला आ.व. 26 मध्ये सशक्त डिपॉझिट संचयाची जोड मिळाली.

धोरणात्मक क्षेत्रांमधील (उदा. रीटेल, एसएमई, कॉर्पोरेट) आगाऊ रकमांमधील वाढ अधिक बळकट होत राहाते आहे, जे बँकेच्या गुणवत्तेवरील आणि नफ्याच्या क्षमतेवरील अभिमुखतेशी साधर्म्य राखते.

1.06%

संपदा गुणवत्ता आ.व. 26च्या 4थ्या तिमाहीत सुधारली, जीएनपीए 2.07% वर घसरला (3ऱ्या तिमाहीत 2.43% होता), आणि एनएनपीए 1.06% वर घसरला (तिमाहीगणिक 1.39% होता)

आमच्या वेबसाईटवर जाण्यासाठी
हा कोड स्कॅन करा.

ठेवी आणि मत्तांमधील निर्वाही वृद्धी बँकेचा निर्धार, ग्राहकांचा दृढ विश्वास आणि उद्योगातील प्रचंड वेग अधोरेखित होतो.

# ठळक आर्थिक बाबी

आ.व. 2025-26

नक्त व्याज उत्पन्न
रु.175.6 कोटी

नेट वर्थ
(अपवादात्मक बाबींनंतर)
रु.820.72 कोटी

एकूण आगाऊ रकमा
रु.6,160.45 कोटी

कासा
रु.2,341 कोटी

**एकूण एयुएम**
(31.03.2026 रोजीनुसार)
रु.11,445 कोटी

# गुणोत्तरे




भांडवल पर्याप्तता

प्रोव्हिजन कव्हरेज







नक्त एनपीए

लिक्विडिटी कव्हरेज#




*नेट वर्थमध्ये भरणा झालेले भांडवल आणि राखीव निधी समाविष्ट आहेत (पुनर्मूल्यांकन राखीव निधी वगळून)

# 31 मार्च 2026 मध्ये संपलेल्या तिमाहीसाठीचे सरासरी एलसीआर

# आमचा वाढता जागतिक ठसा




1. भारत
   1994 पासून उपस्थिती

• मुंबई, चेन्नई, हैदराबाद, आरसी पुरम, बंगळुरु, नवी दिल्ली, अहमदाबाद, पुणे, चंडीगड, कोलकाता, लुधियाना, वाशी, अंधेरी, सुरत, भुज, तिवरी-नायगाव, इंदूर, भुवनेश्वर, आणि पालघर (अबिटघर, गळतरे, तेन नाका, खुपारी) येथे शाखा.

2. मॉरिशस
1973 पासून उपस्थिती

3. केनिया
2017 पासून उपस्थिती

4. मादागास्कर
1998 पासून उपस्थिती

आमच्या वेबसाईटवर जाण्यासाठी हा कोड स्कॅन करा.

SBM bank

**एसबीएम बँक (इंडिया) लि.**

कॉर्पोरेट कार्यालय: 19वा मजला, उर्मी इस्टेट, 95, गणपतराव कदम मार्ग, पेनिन्सुला बिझनेस पार्कसमोर,
लोअर परेल (पश्चिम), मुंबई - 400013.
दूरध्वनी: +91 022 4007 1500 | नि:शुल्क क्रमांक: 1800 2099 335, 1800 1033 817
ई: customercare@sbmbank.co.in | वे: www.sbmbank.co.in